नि. फौ. खटला क्र. **१७९/२०२२**
सरकार विरूद्ध गणेश
**निशाणी २७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव : सुदर्शन सुधाकर देशपांडे,
वय : ५४ वर्षे
धंदा : तलाठी, दहिहांडा साजा,
राहणार : ह.मु.अकोला, ता. व जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. १४/०३/२०२२ रोजी मी दहिहांडा साजा मध्ये तलाठी म्हणुन कार्यरत होतो. सन २०२२ मध्ये ब्रम्हपुरी रेती घाटातुन रेतीची चोरी झाली असे मला पोलीस पाटील दादाराव श्रीराम आठवले यांच्याकडुन समजले होते. सदर ब्रम्हपुरी रेती घाटाचा लिलाव झालेला नव्हता. त्यामुळे तेथुन झालेले गौण खनिजाचे उत्खनन अवैध होते. सदर अवैध उत्खनन गणेश नामक इसमाने केले असे मला पोलीस पाटील यांनी सांगितले होते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जी. कुळकर्णी यांचेमार्फत —**

२. पोलीसांनी सदर घटनेसंदर्भात माझेकडे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेबाबत मला प्रत्यक्षात माहिती नाही कारण सदर घटनेची माहिती मला

पाटलाने दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मंडळ अधिकारी यांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २२.०७.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.